# राष्ट्रीय सेवा योजना

# वार्षिक नियमित कार्यक्रम अहवाल
# सत्र 2018 - 2019

## 1) दिनांक 21 जून 2018 :– योगदिवस



जागतिक योगदिनाच्या निमित्ताने 21 जूनला सकाळी 6.00 वाजता महाविद्यालयात सामुहिक योगासनांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या योगवर्गाला प्राचार्य डॉ. एस. आर. उपाध्याय व श्री. मनिष देशमुख यांनी प्रात्यक्षिके करुन दाखविली त्यानुसार इतर सर्वांनी अनुसरण केले.

यामध्ये भस्त्रिका, कपालभाती, अनुलोमविलोम, उज्जायी इत्यादी योगप्रक्रिया करण्यात आल्या. तसेच पर्वतासन, ताडासन, भुजंगासन, वज्रासन, वीरमुद्रा इत्यादी योगासने करण्यात आली.

कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थीवर्ग बहुसंख्येने उपस्थित होते. शांतीपाठाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## 2) दिनांक 31 जुलै 2018 :— महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण




शासनाच्या 13 कोटी वृक्ष लागवड उपक्रमांतर्गत महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनाच्या वतीने वृक्षारोपनाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाच्या परिसरात वड, चिंच, कडू लिंब, गुलमोहर, पिंपळ यांची प्रत्येकी दोन अशी एकूण 10 झाडे लावण्यात आली. देवळी पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्री. दिलीपराव ठाकूर या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी होते.



**एसएसएनजे महाविद्यालयात वृक्षारोपण**

**देवळी :** शासनाच्या १३ कोटी वृक्ष लागवड उपक्रमांतर्गत येथील एसएसएनजे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमाला ठाणेदार दिलीप ठाकूर, प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय, प्रा.डॉ. प्रभाकर ढाले, प्रा.विवेक देशमुख, प्रा. जगदीश याक्ले, कवडू डायरे, प्रा.डॉ. किटे, प्रा. चुटके, प्रा. पिल्लेंवान, प्रा. मोरे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे आयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. गणेश मालधुरे, रासेयो सहकार्यक्रम अधिकारी प्रा. गोपाल हेलोंडे, सहाय्यक प्रशांत कुमरे यांच्या मार्गदर्शनात रासेयो पथकाच्या विद्यार्थ्यांनी केले होते.

यावेळी दिलीप ठाकूर यांनी आजच्या काळात वृक्षारोपण हे श्रेष्ठ सत्कर्म आहे. आपण आपल्या परिसरात जमेल तेवढे झाडे लावावी. त्याचे संगोपन करणेही तेवढेच महत्त्वाचे आहे.

तुकाराम महाराजांनी 'वृक्षावल्ली आम्हा सोयरे वनचरी' का म्हटले. त्याचे महत्त्व आज आपल्या लक्षात येत आहे. त्यामुळे शासनाचा संकल्प पुर्णत्वास नेण्यासाठी सर्वांनी हातभार लावावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. गोपाल हेलोंडे यांनी केले. संचालन प्रणाली जाधव हिने केले. उपस्थितांचे आभार प्रा.डॉ. गणेश मालधुरे यांनी मानले.

समारोपीय कार्यक्रमात बोलताना श्री ठाकुर म्हणाले की, आजच्या काळात वृक्षारोपन हे श्रेष्ठ सत्कर्म आहे. आपण आपल्या परिसरात जमेल तेवढी झाडे लावली पाहिजेत. लावलेल्या झाडांचे संगोपणही तेवढेच महत्त्वाचे आहे. तुकाराम महाराजांनी 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरी' का म्हटले, त्याचे महत्त्व आज आपल्या लक्षात येत आहे. त्यामुळे शासनाचा संकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी सर्वांनी हातभार लावावा, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. एस. आर. उपाध्याय, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. गणेश मालधुरे, रा.से.यो. सहकार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. गोपाल हेलोंडे,

सहाय्यक प्रा. प्रशांत कुमरे, प्रा.डॉ. प्रभाकर ढाले, प्रा. विवेक देशमुख, प्रा. जगदीश यावले, प्रा. कांचन किटे, श्री. कवडू डायरे व विद्यार्थी उपस्थित होते.

## 3) दिनांक 6 ऑगस्ट 2018 :— 'सायबर क्राइम' या विषयावर उद्‌बोधन

महाविद्यालयीन विद्यार्थी असणारे युवा—युवती यांच्यात सायबर क्राइम विषयी जागृती होण्याच्या उद्देशाने पोलीस स्टेशन देवळी येथील पोलीस इन्स्पेक्टर श्री. दिलीपराव ठाकूर यांचे सायबर क्राइम या विषयावर रा.से.यो. विभागाद्वारे महाविद्यालयातील संपूर्ण विद्यार्थ्यांकरिता विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले.




यावेळी उद्‌बोधन करताना श्री ठाकूर म्हणाले, आज मोबाइल अतिशय आवश्यक व गरजेची वस्तू झाली आहे. परंतु त्याचा उपयोग आवश्यक तेवढाच करावा. मोबाईल हे एक नवीन व्यसन बनू नये. सोबतच युवकांनी सायबर क्राइमबाबत सावध राहावे. आजचा युवक यु—टयुब, फेसबुक, टयुटर आदींचा वापर करतो. तो आपली खाजगी माहिती इतरांकडे शेअर करतो. त्यामुळे त्यातील धोके ओळखले पाहिजे. काही लोक या माध्यमातून अफवा पसरविण्याचे काम करतात. त्याचा समाज मनावर विपरित परिणाम होतो. काही लोक अज्ञानाने काही चुकीचा मजकुर यु—टयुबर टाकतात, त्यामुळे इतरांच्या भावना दुखावतात. असे सर्व प्रकार युवकांनी टाळले पाहिजेत.



**युवकांनी सायबर क्राइमबाबत सावध राहावे : ठाकूर**

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी

**देवळी** : आज मोबाइल अतिशय आवश्यक व गरजेचे वस्तू झाली आहे. परंतू त्यांचा उपयोग आवश्यक तेवढाच करावा. मोबाईल हे एक नविन व्यसन बनु नये, सोबतच युवकांनी सायबर क्राईमबाबत सावध राहावे, असा सल्ला पोलीस निरीक्षक दिलीप ठाकूर यांनी उपस्थितांना दिला.

स्थानिक एसएसएनजे महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ठाकूर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. आर. उपाध्याय यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना पोलीस निरीक्षक ठाकूर म्हणाले, आजचा युवक युट्यूब चॅनल, फेसबुक, ट्युटर आदींचा वापर करतो. तो आपली खासगी माहिती इतरांकडे शेअर करतो. त्यामुळे त्यातील धोके ओळखले पाहिजे. काही लोक या माध्यमामातून अफवा पसरविण्याचे काम करतात. त्याचा समाज मनावर परिणाम होतो. ग्रुपवर आलेले संदेश वास्तविकता न पडताळता पुढे पाठविले जातात. अज्ञानाने काही मजकूर यु ट्युबवर टाकण्यात येतो. यातून भावना दुखावल्या जातात. हा सर्व प्रकार युवकानी टाळावा, असे आवाहन ठाकूर यांनी केले. मार्गदर्शन करताना उपाध्याय म्हणाले, मोबाइलचा वापर शिक्षणाकरिता करा. मनोरंजनाकरिता करू नका असा संदेश दिला. रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. गोपाल हेलोंडे यांनी विचार मांडले.

कार्यक्रमाचे संचालन प्रणाली जाधव हिने केले. प्रशांत कुमरे, डॉ. दिलीप जबडे, प्रा. कांचन किटे, प्रा. संतोष मोहदुरे, प्रा. रमेश कोहाड, प्रा. प्रभाकर ढोले, प्रा. धनराज मुंगल, प्रा. देशमुख, प्रा. चुटके यांच्यासह विद्यार्थ्यांची कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. गोपाल हेलोंडे यांनी केले तर समारोप व आभारप्रदर्शन कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. गणेश मालधुरे यांनी केले.

## 4) दिनांक 24 ऑगस्ट 2018 :– रा.से.यो. पथक उद्‌घाटन

महाविद्यालयातील या सत्राचा रा.से.यो. पथकाचा उद्‌घाटनाचा कार्यक्रम व रेड रिबन क्लबच्या उद्‌घाटनाचा कार्यक्रम संयुक्तपणे घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहकार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. गोपाल हेलोंडे यांनी केले. या कार्यक्रमाला रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. गणेश मालधुरे, ग्रामीण रुग्णालय भिडीचे समुपदेशक श्री. विजय ओझा, प्रयोगशाळा तंत्रज्ञ माधुरी भोयर यांची उपस्थिती होती.

रा.से.यो. पथकाचे व रेड रिबन क्लबचे उद्‌घाटन प्रा.डॉ. राजेंद्र माणिकपुरे यांनी केले. याप्रसंगी प्रा. माणिकपुरे यांनी रा.से.यो. या उपक्रमाच्या माध्यमातून महाविद्यालयीन




विद्यार्थ्यांना समाजाशी नाते जोडण्यास शिकविते. घरी स्वतःचीही कामे न करणारे विद्यार्थी रा.से.यो. मध्ये सहभागी झाल्यानंतर समूहामध्ये सर्व कामे करतात. त्यांच्यात समाजसेवेची भावना निर्माण होते. महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानातून प्रेरणा घेऊन भारत सरकारने हा उपक्रम महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता प्रत्येक महाविद्यालयात सुरु केला. त्यामुळेच रा.से.यो. च्या माध्यमातून गांधीजींचे मानवतावादी तत्त्वज्ञान व सेवाभाव विद्यार्थ्यांनी समाजाच्या शेवटच्या टोकापर्यंत पोहोचविण्याचे कार्य करावे असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे संचालन कु. प्राजक्ता डफरे यांनी व आभार प्रदर्शन कु. प्रतिक्षा चौधरी यांनी केले.

## 5) दिनांक 19 सप्टेंबर 2018 :– उद्‌बोधन वर्ग

दिनांक 24 सप्टेंबर हा राष्ट्रीय सेवा योजना दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. तसेच युवा–वेध सप्ताहाची सुरुवात सुध्दा याच दिवशी केली जाते. या कार्यक्रमाची तयारी म्हणून एक उद्‌बोधन वर्ग आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी माजी कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. रफिक शेख उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच दि. 24 सप्टेंबरच्या कार्यक्रमाच्या तयारीच्या संदर्भात कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. गणेश मालधुरे यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

## 6) दिनांक 24 सप्टेंबर 2018 :– राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन आणि युवा वेध सप्ताह उद्‌घाटन




दि. 24 सप्टेंबरला रा.से.यो. दिनाचा कार्यक्रम आयोजित केलेला होता. या कार्यक्रमाला जागृती व्यसन केंद्र देवळीचे प्रमुख श्री. दादारावजी मून प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. गणेश मालधुरे यांनी केले. प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. तसेच माजी कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. रफिक शेख हे प्रमुख वक्ता म्हणून उपस्थित होते. कु. प्रतिक्षा चौधरी यांनी कार्यक्रमाचे संचालन केले तर श्री. आकाश बहाळे यांनी आभार प्रदर्शन केले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रमुख अतिथी श्री. दादारावजी मून म्हणाले की, ''राष्ट्रीय सेवा योजना या भारत सरकारच्या उपक्रमात सेवावृत्ती हाच महत्त्वाचा भाग आहे. आपआपल्यापरीने समाजाला काही देणे ही आपली जाबाबदारी आहे. रा.से.यो. च्या विद्यार्थ्यांनी समाज सेवेचे महत्त्व समजून घ्यावे व समाजसेवेला वाहून घ्यावे. त्यांनी महाराष्ट्रातील प्रबोधनकारांचा आदर्श लक्षात ठेवून संत तुकाराम, संत गाडगे महाराज, श्री. तुकडोजी महाराज यांच्याप्रमाणे समाज प्रबोधनाचे व अंधःश्रध्दा निर्मूलनाचे काम करावे.



विदर्भ मतदार

सेवा कर्म हाच परमधर्म : दादाराव मून



या कार्यक्रमाला प्रा.डॉ. दिलीप दबडे, प्रा.डॉ. युवराज खोटेले, प्रा.डॉ. रमेश कोहाड, प्रा.डॉ. कांचन किटे, प्रा. माधुरी देशमुख, प्रा. सुषमा कांबळे, प्रा. प्रशांत कुमरे व रा.से.यो.चे 125 विद्यार्थी उपस्थित होते.

## 7) युवावेध सप्ताह :–

### युवावेध सप्ताह – कार्यक्रम पत्रिका

### (दि. 24 सप्टेंबर ते 01 ऑक्टोबर 2018)

| दिनांक | कार्यक्रम | विषय |
|---|---|---|
| 24 / 09 / 2018 | रासेयो स्थापना दिन व युवावेध सप्ताह उद्घाटन कार्यक्रम | ––– |
| 25 / 09 / 2018 | भावगीत स्पर्धा | संगीत |
| 26 / 09 / 2018 | पोस्टर / स्लोगन स्पर्धा | पर्यावरण |
| 27 / 09 / 2018 | वक्तृत्व स्पर्धा | प्लास्टीक बंदी यशस्वी होईल काय? |

| | | |
|---|---|---|
| 28/09/2018 | निबंध स्पर्धा | प्लास्टीक व पर्यावरण |
| 29/09/2018 | वादविवाद स्पर्धा | आरक्षण : जातीवर की आर्थिक दर्जावर? |
| 30/09/2018 | स्वच्छता मोहिम | ग्रामस्वच्छता |
| 01/10/2018 | समारोपीय कार्यक्रम | ——— |

## 8) दिनांक 01 ऑक्टोबर 2018 :— युवावेध सप्ताह समारोपीय कार्यक्रम




दि. 24 सप्टेंबर ते 01 ऑक्टोबर 2018 या दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या युवावेध सप्ताहा अंतर्गत विविध स्पर्धा घेण्यात आलेल्या होत्या. या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या आणि प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके आणि प्रमाणपत्र वितरणाचा कार्यक्रम या समारोपीय कार्यक्रमात घेण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. केशव कुवारे जनता महाविद्यालय, देवळी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.



**एसएसएनजे महाविद्यालयात रासेयो दिवस व युवावेध सप्ताह**

पुण्य नगरी / प्रतिनिधी

देवळी : येथील एसएसएनजे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिवस व युवावेध सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

या सप्ताहाचे उद्घाटन दादाराव मून यांनी केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस.आर. उपाध्याय होते. प्रसंगी दादाराव मून यांनी राष्ट्रीय सेवा योजना या भारत सरकारच्या उपक्रमात सेवावृत्ती हाच महत्त्वाचा भाग आहे. आपआपल्या परिने समाजाला काही देणे ही आपली जबाबदारी आहे. रासेयोच्या विद्यार्थ्यांनी समाज सेवेचे महत्त्व समजून घ्यावे व समाजसेवेला वाहून घ्यावे, त्यांनी महाराष्ट्रातील प्रबोधनकारांचा आदर्श ठेऊन संत तुकाराम, संत गाडगे महाराज, तुकडोजी महाराज यांच्याप्रमाणे समाज प्रबोधनाचे व अंधःश्रद्धा निर्मूलनाचे काम करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. गणेश मालधुरे यांनी केले. संचालन प्रतिक्षा चौधरी तर उपस्थितांचे आभार आकाश बहाळे यांनी मानले. कार्यक्रमाला प्रा.डॉ. दिलीप दबडे, प्रा.डॉ. युवराज खोटेले, प्रा.डॉ. रमेश कोहाड, प्रा.डॉ. कांचन किटे, प्रा.माधुरी देशमुख, प्रा.सुषमा कांबळे, प्रा. प्रशांत कुमरे, प्रा. विवेक देशमुख व रासेयोचे विद्यार्थी उपस्थित होते.

मान्यवरांचे मार्गदर्शनपर भाषण झाल्यावर विविध स्पर्धामध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक आणि प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. कार्यक्रमास रा.से.यो. चे स्वयंसेवक — स्वयंसेविका तसेच महाविद्यालयातील कर्मचारीवर्ग उपस्थित होता.

## 9) दिनांक 02 ऑक्टोबर 2018 :– शांती पदयात्रा




महात्मा गांधी यांच्या जन्मदिनी 2 ऑक्टोबरला आंतरराष्ट्रीय अंहिसा दिनानिमित्त वर्धा शहरातील महात्मा गांधीचा पुतळा ते सेवाग्राम आश्रम अशी शांती पदयात्रा काढण्यात येते. या शांतीपदयात्रेमध्ये आमच्या महाविद्यालयातील रा.से.यो. पथकाने भाग घेतला. सेवाग्राम आश्रम येथे होणाऱ्या प्रमुख कार्यक्रमाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांनी सु. श्री. कांचनजी व प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्या व्याख्यानांचा लाभ घेतला.

## 10) दिनांक 10 ऑक्टोबर 2018 :–




जागतिक मानसिक स्वास्थ्य दिन जागतिक मानसिक स्वास्थ्य दिनानिमित्त मानसिक आरोग्य सप्ताह पाळण्यात आला. हा कार्यक्रम माई हॉस्पीटल देवळी, जवाहरलाल नेहरु मेडिकल कॉलेज सावंगी मेघे, नर्सिंग कॉलेज, सावंगी मेघे, वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने रा.से.यो. विभागाद्वारे घेण्यात आला या कार्यक्रमाला डॉ. सारिका डाखोडे, सहाय्यक प्राध्यापक कम्युनिटी मेडिसीन जे.एन.एम.सी. सावंगी मेघे, श्रीमती डॉ. पुजा कस्तुरकर सहयोगी प्राध्यापक श्रीमती राधिकाबाई मेघे नर्सिंग कॉलेज सावंगी मेघे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी विविध मानसिक रोगांविषयी मार्गदर्शन केले. समाजात व्यक्तिसोबत योग्य संवाद होत नसल्यामुळे ते

मानसिक रुग्ण होतात. त्यांना समुपदेशनाची गरज असते असे त्यांनी सांगितले. समुपदेशनाने एखाद्याचा मानसिक रोग कसा बरा करता येतो यावर श्रीमती राधिकाबाई मेघे नर्सिंग कॉलेजच्या करिश्मा चौरे, शुभांगी डांगे, सीमा यादव, प्रज्ञा मेंढे, पुनम केवट, कल्याणी नारनवरे, तस्लीम शेख, रुपाली वरघणे, श्वेता रोडगे, रेखा वासनिक इत्यादिंनी नाटिका सादर केली.

## 11) दिनांक 26 नोव्हेंबर 2018 :– संविधान दिवस




26 नोव्हेंबरला संविधान दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. जगदीश यावले यांनी केले. सहकार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. गोपाल हेलोंडे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांकडून संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे सामुहिक वाचन करवून घेतले. या कार्यक्रमाला प्रा. डॉ. दिलीप दबडे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते, ते म्हणाले ''नवीन भारत घडविण्याची ताकद केवळ भारतीय संविधानात आहे''. डॉ. आंबेडकर लिखित संविधानाने जात – धर्म आणि लिंगभेद मिटविले आणि प्रत्येकाला विकासाचा मार्ग मोकळा करुन दिला.



देशोन्नती

शनिवार ,दि.८ डिसेंबर २०१८

### संविधानामुळे राष्ट्रीय एकात्मता

तालुका प्रतिनिधी / ७ डिसेंबर

देवळी :नवीन भारत घडविण्याची ताकद केवळ भारतीय संविधानात आहे. डॉ. आंबेडकर लिखीत संविधानाने जात-धर्म आणि लिंगभेद मिटविले आणि प्रत्येकाला विकासाचा मार्ग मोकळा करुन दिला, असे उद्‌गार डॉ. दिलीप दबडे यांनी काढले. ते स्थानिक एस.एस.एन. जे. महाविद्यालयात संविधान दिवस कार्यक्रमात बोलत होते. प्रास्ताविक डॉ. गोपाल हेलोंडे यांनी केले. यावेळी घटनेच्या उद्देशपत्रीकेचे वाचन त्यांनी करुन घेतले. प्रा. अमीत चिनेवार, प्रा. जगदीश यावले यांनी संविधाना विषयी विचार व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रा. से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. गणेश मालधुरे होते. त्यांनी संविधानाची प्रत प्रत्येक भारतीय नागरिकाने आपल्या घरी दिवाणखाण्यात ठेवावी व तिचे अध्ययन करावे असे आवाहन केले.

## 12) दिनांक 3 डिसेंबर 2018 :— एड्स सप्ताह कार्यक्रम



एड्स सप्ताहानिमित्त डॉ. सारिका डाखोडे, सहाय्यक प्राध्यापक कम्युनिटी मेडिसीन जवाहरलाल नेहरु मेडिकल कॉलेज सावंगी व त्यांच्या विद्यार्थीनी यांनी एड्स संबंधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. तसेच प्रबोधन सत्रानंतर महाविद्यालयाच्या प्रांगणात डॉ. डाखोडे यांच्या विद्यार्थीनींनी एड्स रोगासंबंधी जनजागृती करण्याकरिता एक विशेष पथनाट्य सादर केले.

या कार्यक्रमाला डॉ. संतोष प्रजापती वैद्यकीय अधिकारी, माई हॉस्पीटल देवळी व त्यांचे कर्मचारीही उपस्थित होते.

## 13) दिनांक 16 जानेवारी ते 22 जानेवारी 2019 :— विशेष निवासी श्रमसंस्कार शिबीर




विशेष निवासी श्रमसंस्कार शिबीर नांदोर (डफरे) येथे घेण्यात आले. त्यात रोज सकाळी 6.00 वाजता प्रार्थना 9 ते 10.30 पर्यंत श्रमदान करण्यात येत होते. दुपारच्या प्रबोधन सत्रात श्री. निलेश गुल्हाणे, श्री. अजय इंगोले, श्री. शेषराव बावनकर, श्री.प्रा. मोहन गुजरकर, प्रा. विवेक देशमुख इत्यादींची विशेष व्याख्याने झाली.

रोज संध्याकाळी शिबीरार्थी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. त्यात बेटी बचाओ, बेटी पढाओ, हुंडाबंदी, नशाबंदी, अंधःश्रध्दा निर्मूलन, मोबाईलचा दुरुपयोग व सायबर क्राइम इत्यादी विषयावर नाटिका सादर करण्यात आल्या.

## 14) दिनांक 10 फेब्रुवारी 2019 : लोकशाही पंधरवाडा दिवस



महाराष्ट्र शासनाच्या आवाहनानुसार लोकशाही पंधरवाडा हा उपक्रम राबविण्यात आला. दि. 10 फेब्रुवारी 2019 ला रा.से.यो. तर्फे शेजारच्या पाचगावमध्ये मतदार जागृती रॅली काढण्यात आली. त्यानंतर महाविद्यालयाच्या सभागृहात विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रिया व मतदार नोंदणी या विषयावर मार्गदर्शनाचा कार्यक्रम झाला. प्रा. डॉ. प्रभाकर ढाले यांनी विद्यार्थ्यांना संपूर्ण निवडणूक प्रक्रिया समजावून सांगितली तसेच प्रा. संतोष मोहदरे यांनी मतदार नोंदणीकरिता आवश्यक असलेल्या कागदपत्रांची माहिती दिली व प्रत्येक 18 वर्षावरील युवक – युवतीने न चुकता मतदार यादीत आपले नाव नोंदवावे व मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. गणेश मालधुरे हे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना आपला लोकशाही प्रक्रिये मध्ये सहभाग असावा. तसेच देशाची सक्षम, मजबूत शासनव्यवस्था व सरकार निर्माण करणे हे जनतेचे जबाबदारीचे कर्तव्य आहे. असे सांगितले.

## 15) दिनांक 10 मे 2019 वाटरकप स्पर्धा 2019




पानी फौंडेशन तर्फे वाटखेडा येथे सत्यमेव जयते वाटरकप स्पर्धा घेण्यात आली. वाटखेडा (ता. देवळी) शिवारात ग्रामस्थ, एन.सी.सी., एन. एस.एस. चे विद्यार्थी यांच्या सहभागाने पाणी अडविण्याकरिता 10 मिटर लांबीचे चर खोदण्यात आले.

या श्रमदानाकरिता श्री. विवेक भिमनवार जिल्हाधिकारी, वर्धा एन.सी.सी. प्रमुख कॅप्टन गुजरकर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. गणेश मालधुरे, प्रा. गणेश गाडेकर (यवतमाळ) सरपंच श्री. मंगेश वानखडे, वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच वाटखेडा येथील स्त्री – पुरुष बहुसंख्येने हजर होते.

**प्रा.डॉ. गणेश मालधुरे**
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

# विद्यार्थ्यांचा विशेष सहभाग

दि. 2 ऑक्टोबर हा जागतिक अहिंसा दिवस पाळल्या जातो. या दिवशी वर्धा येथील महात्मा गांधी पुतळयापासून सेवाग्राम आश्रमपर्यंत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची शांती पदयात्रा काढण्यात येते. आमच्या महाविद्यालयातील 40 विद्यार्थ्यांनी या पदयात्रेत भाग घेतला. तसेच सेवाग्राम आश्रमातील मुख्य कार्यक्रमातील सु.श्री.कांचनजी व प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्या व्याख्यानांचा लाभ घेतला.

दि. 24 सप्टेंबर ते 1 ऑक्टोबर 2018 पर्यंत युवावेध सप्ताह कार्यक्रम घेण्यात आला. त्यात निबंधस्पर्धा, वादविवाद स्पर्धा, पोस्टर स्पर्धा वक्तृत्त्व स्पर्धा, भावगीत स्पर्धा इत्यादी स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत एकूण 30 विद्यार्थ्यांनी भाग घेतला. त्यातील प्रत्येक स्पर्धेत विजयी होणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय क्रमांकाचे बक्षीस व प्रमाणपत्र देण्यात आले.



वर्धा, सोमवार, ११ फेब्रुवारी २०१९ ४

देवळी : एसएसएनजे महाविद्यालयातील स्वयंसेवक, उपस्थित मान्यवर.

**राज्यपथ संचलनात आदित्य इखारचा सहभाग**

देवळी : स्थानिक एसएसएनजे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक आदित्य इखार याने प्रजासत्ताकदिनी मुंबई येथे झालेल्या राज्यपथ संचालनामध्ये सहभाग नोंदविला. या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवायोजना पथकातील या राज्य पथसंचलनामध्ये सहभाग नोंदविणारा आतापर्यंतचा हा पाचवा स्वयंसेवक आहे. यापूर्वी चार स्वयंसेवकांनी राज्य पथसंचलन व राष्ट्रीय पथसंचलनामध्ये सहभाग नोंदविला आहे. या महाविद्यालयातील रासेयो पथकाच्या वतीने विविध समाजोपयागी व राष्ट्रीय हिताचा दृष्टिकोनाने महत्त्वाचे समजले जाणारे उपक्रम यशस्वीपणे राबविले आहे. त्यामुळेच महाविद्यालयातील रासेयो पथकाला उत्कृष्ट पथक म्हणून विद्यापीठस्तरीय पुरस्कारसुद्धा मिळाला आहे. यशाबद्दल आदित्य इखार याचा प्राचार्य डॉ. सुरेश उपाध्याय यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. डॉ. गणेश मालधुरे, डॉ. गोपाल हेलोंडे, प्रशांत कुम्रे यांनी अभिनंदन केले. कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

यावर्षी आमच्या महाविद्यालयातील बी.कॉम भाग 1 सेम 4 मधील विद्यार्थी **श्री. आदित्य इखार** याची 26 जानेवारी 2019 करिता राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलना करिता निवड झाली. तो राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचालनात मुंबई येथे सहभागी झाला होता. त्याबद्दल त्याचे मा.श्री. सिध्दिविनायक काणे, कुलगुरु रा.तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी अभिनंदन केले. तसेच महाविद्यालयातर्फे त्याचा सत्कार करण्यात आला. सदर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथकातील या राज्य पथसंचालना मध्ये सहभाग नोंदवणारा आतापर्यंतचा हा पाचवा




स्वयंसेवक आहे. या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने विविध समाजोपयोगी व राष्ट्रीय हीताच्या दृष्टिकोनाने महत्त्वाचे समजले जाणारे उपक्रम यशस्वीपणे राबविले आहेत, त्यामुळेच महाविद्यालयातील रा. से.यो. पथकाला उत्कृष्ट पथक म्हणून विद्यापीठ स्तरीय पुरस्कार सुद्धा मिळालेला आहे.

**सत्यमेव जयते वाटरकप स्पर्धेत सहभाग :** पानी फौंडेशन तर्फे आयोजित सत्यमेव जयते वाटरकप स्पर्धेत (दि. 10 मे 2019) रा.से.यो. विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ही स्पर्धा देवळी तालुक्यातील वाटखेडा शिवारात घेण्यात आली. या स्पर्धेत रा.से.यो. विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांच्या सहकार्याने 10 मिटर लांबीचे चर खोदले त्यामुळे पावसाळयात पडणारे पाणी या चरात थांबून शिवारातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होईल. हा कार्यक्रम जिल्हाधिकारी मा.श्री. विवेकजी भिमनवार यांच्या मार्गदर्शनात पार पडला.

**प्रा.डॉ. गणेश मालधुरे**
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

# विशेष निवासी श्रमसंस्कार शिबीर अहवाल

देवळी तालुक्यातील नांदोरा (डफरे) या रा.से.यो.ने. दत्तक घेतलेल्या गावी भारत सरकारच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत सत्र 2018–2019 चे विशेष निवासी श्रम संस्कार शिबीर 'स्वच्छतेसाठी युवक' या संकल्पनेवर आधारित आयोजित करण्यात आले होते. दि. 16 जानेवारी 2019 ते 22 जानेवारी 2019 या कालावधीत हे शिबीर घेण्यात आले. या शिबीरात श्रमप्रतिष्ठेबरोबरच मनातील सृजनता जागी व्हावी यादृष्टीने विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या तज्ञांना विशेष व्याख्यानांसाठी आमंत्रित करण्यात आले होते. नांदोरा (डफरे) येथील ग्रामपंचायत सदस्य, महिला बचत गट, गुरुदेव सेवा मंडळ, संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थान विश्वस्त यांच्या सहकार्याने ग्रामस्वच्छता, अंधःश्रध्दा निर्मूलन, आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, स्त्री भ्रुणहत्या, ग्रामविकास इत्यादी कार्यक्रम राबविण्यात आले. त्याचा दैनंदिन अहवाल सादर करीत आहोत.

**दिनांक 16 जानेवारी 2019 :–**




सकाळी 8.00 ते 9.00 या वेळेत शिबिरार्थ्यांचे आगमन झाले. त्यांच्या नावाची नोंदणी करण्यात आली. परस्परांचा परिचय करुन अल्पोपाहराचा कार्यक्रम झाला. सकाळी 9.00 ते 10.00 या वेळेत संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थान परिसरातील राहण्यांच्या खोल्यांची स्वच्छता

करण्यात आली. त्यानंतर शिबीरार्थ्यांचे सामुहिक डब्बा – जेवन झाले. दुपारी 1.00 ते 2.00 या वेळेत शिबीरार्थ्यांचे 10 गट तयार करण्यात आले. त्यांच्याकडून प्रकल्प अवलोकन व 7 दिवसांच्या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले.

दुपारी 3.00 ते 6.00 या वेळेत शिबीर उद्घाटन समारोह झाला. या उद्घाटन कार्यक्रमाला श्री. गुलाबराव डफरे माजी सभापती पंचायत समिति देवळी हे उद्घाटक लाभले. प्राचार्य डॉ. एस.आर. उपाध्याय हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. तसेच देवळी पोलीस ठाणे येथील पोलीस निरीक्षक श्री नितीनजी लेव्हरकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच सरपंच श्री. मनोज डफरे, संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे विश्वस्त श्री. भानुदासजी डफरे, रा. से.यो. विभागीय समन्वयक प्रा.डॉ. गोपाल हेलोंडे, श्री. राजाभाऊ देशमुख (प्रतिष्ठित नागरिक) प्रा.डॉ. रफिक शेख (कार्यक्रम अधिकारी, रा.से.यो. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, केंद्र देवळी) यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. गणेश मालधुरे यांनी केले. उद्घाटक श्री. गुलाबराव डफरे यांनी शिबीरार्थ्यांकडून काही अपेक्षा करणारे भाषण केले. प्रमुख अतिथी श्री. नितीनजी लेव्हरकर (PSI) यांनी महाविद्यालयीन जीवनाचे महत्त्व व रा.से.यो. सारख्या उपक्रमातून घडणारा व्यक्तिमत्त्व विकास याबाबतीत मार्गदर्शन केले. श्री. रजत मसराम (बी.कॉम अंत्य) यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. उद्घाटन समारोहानंतर प्रमुख अतिथी व सर्व शिबीरार्थी यांचे सामुहिक स्नेहभोजन झाले.

रात्री 8.00 ते 10.00 या वेळेत चिकणी (जामणी) येथील श्री. गुरुदेव भजन मंडळाच्या भजन गायकांचा संगीतमय कार्यक्रम झाला.

**दिनांक 17 जानेवारी 2019 :—**

सकाळी शिबीरार्थ्यांनी परिसर झाडून स्वच्छ केला. त्यानंतर मंडपात प्रातःकालीन प्रार्थना, भजने व स्फूर्तीगीते म्हणण्यात आली. सकाळी 8.00 ते 9.00 या वेळात ग्रामस्थांसोबत गावातील समस्याबाबत चर्चा करण्यात आली. 9.00 ते 10.00 या वेळेत गावातील मुख्य रस्त्याने झाडझुड करुन कचरा उचलण्यात आला.

दुपारी 3.00 ते 5.00 या वेळेत प्रा. विवेक देशमुख यांचे 'छत्रपती शिवरायांची शासनव्यवस्था' या विषयावर प्रबोधन झाले. त्यांनी शिवाजी महाराजांच्या शासनामध्ये विविध पदावर असलेल्या व्यक्तींचे कर्तृत्व व त्या पदाची जबाबदारी याचे अभ्यासपूर्ण, सखोल विवेचन केले. कॅ. मोहन गुजरकर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. त्यांनी सुध्दा शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडून दाखविले.

संध्याकाळी 7.00 वाजता गावातून मशाल यात्रा (रॅली) काढण्यात आली. त्यात विविध समाजजागृतीपर गीते म्हणण्यात आली व गावामध्ये शिबीराविषयी माहिती देण्यात आली.

रात्री 8.00 ते 10.00 पर्यंत सप्तखंजेरी वादक श्री. दीपक भांडेकर व संच यांचा प्रबोधनपर कार्यक्रम झाला. त्यांनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शिक्षणाकडे विशेष लक्ष द्यावे असे स्वतःचे चरित्र सांगून आवाहन केले. आपण कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही घरात जन्माला आलो तरी आपल्या जिद्दीने व चिकाटीने परिस्थितीवर मात करुन आपल्याला आपले जीवन घडविता येते असा संदेश त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गोपाळ गणेश आगरकर, साने

गुरुजी, डॉ. पंजाबराव देशमुख (अमरावती) यांची चरित्रे सांगून विद्यार्थ्यांना दिला.

**दिनांक 18 जानेवारी 2019 :–**



सकाळी 6.00 ते 8.00 या वेळेत प्रातःकालीन प्रार्थना, स्फूर्तीगीते व योगासने करण्यात आली. तद्नंतर नाश्ता चहा झाला व 9.00 ते 10.00 नांदोरा गावाबाहेरील रस्त्यावर गीट्टी टाकण्याचे श्रमदान करण्यात आले.

सकाळी 10.00 वाजतापासून आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी मेघे येथील डॉक्टर व सहाय्यक कर्मचारी यांच्यातर्फे आरोग्य शिबीर व रक्तदान शिबीराला सुरुवात झाली. आरोग्य शिबीराचा नांदोरा (डफरे) येथील 72 ग्रामस्थांनी लाभ घेतला. रक्तदान शिबीरामध्ये प्रा.डॉ. रफिक शेख, श्री. शुभम कडू, पंकज नेहारे, शुध्दोधन मून, अजय उइके, सागर कामडी, हर्षल गायकवाड, संकेत सुरकार, संदिप भुजाडे इत्यादिंनी रक्तदान केले.

रात्री 8.00 ते 10.00 या वेळेत श्री प्रशांत कुमरे यांचा मनोरंजनातून समाज प्रबोधन कार्यक्रम झाला. त्यांनी खेडयातील लोकांच्या सवयीवर भाष्य केले. हसवता हसवता मार्गदर्शनही केले.

**दिनांक 19 जानेवारी 2019 :–**

सकाळी 6.00 ते 8.00 प्रातःकालीन प्रार्थना आत्मचिंतनपर भजने व योगासने करण्यात आली. 9.00 ते 11.00 या वेळेत रस्त्याच्या कामावर श्रमदान करण्यात आले.

दुपारच्या प्रबोधन सत्रामध्ये प्रा. संतोष मोहदरे यांचे 'ग्लोबल वार्मींग व पर्यावरण' या विषयावर व्याख्यान झाले. त्यांनी वैज्ञानिक दृष्टिने आकडेवारीसहीत विद्यार्थ्यांना हा विषय समजावून सांगितला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. गणेश मालधुरे होते. त्यांनी म्हटले की, समाजातील काही जाणकार लोक पर्यावरणसंबंधी जणजागृती करीत आहेत. परंतु आजही समाजाची मानसिकता केवळ स्वतःपुरते पाहण्याची आहे. हा आपल्या समाजाचा फार मोठा दोष आहे. हा दोष दूर करण्याचा प्रयत्न रा.से. यो. स्वयंसेवकांनी करावा. त्याची सुरुवात स्वतःपासून करावी व पर्यावरणाची जपणूक करावी.




रात्री 8.00 ते 10.00 या वेळेत विद्यार्थ्यांनी 'बेटी बचाव बेटी पढाव', दारुचे भयंकर दुष्परिणाम हया नाटिका सादर केल्या. त्यानंतर कु. प्रज्ञा काथवटे, बी.कॉम भाग–1 सेम–1 हिने सुगम संगीताचा कार्यक्रम सादर केला.

**दिनांक 20 जानेवारी 2019 :–**

सकाळी 6.00 ते 8.00 या वेळेत श्री. सतीशजी जपुरकार महाराज यांच्या मार्गदर्शनात भक्तीगीते, सर्वधर्म प्रार्थना हा उपक्रम पार पडला. त्यांनी आपल्या छोटयाशा चिंतनातून दैनंदिन जीवनात श्रध्देची व आध्यात्मिकतेची का आवश्यकता आहे यावर विचार मांडले.

सकाळी 9.00 ते 11.00 या वेळेत दररोजप्रमाणे नांदोरा गावातील रस्त्याचे खडीकरणाचे श्रमदान केले.




दुपारच्या सत्रात 3.00 ते 5.00 या वेळेत श्री. अजयजी इंगोले, तालुका संघटक अ.भा. अंधःश्रध्दा निर्मूलन समिती यांचे 'अंधःश्रध्दा : एक सामाजिक रोग' या विषयावर सप्रयोग व्याख्यान झाले. त्यांनी अनेक प्रयोगातून चमत्कारामागील विज्ञान उलगडून दाखविले.

रात्री 8.00 ते 10.00 या वेळेत 'गाडगे महाराजांचा संदेश, 'मोबाईलचे दुष्परिणाम' इत्यादि विषयावर स्वयंसेवकांनी नाटिका सादर केल्या.

**दिनांक 21 जानेवारी 2019 :–**

पहाटे 6.00 ते 8.00 या वेळेत प्रार्थना करण्यात आली. त्यानंतर आत्मचिंतन व योगासने करण्यात आली.

सकाळी 9.00 ते 11.00 या वेळेत गावातील रस्ते झाडून नाल्यांची सफाई करण्यात आली. गावातील सांडपाण्यासंबंधी ग्रामस्थांना सूचना देण्यात आल्या व शोषखड्डे करण्याची शिफारस करण्यात आली.



पुण्य नगरी

गुरुवार, २४ जानेवारी २०१९ । वर्धा

Local

## नांदोरा येथे रासेयो शिबिरात प्रबोधनात्मक मार्गदर्शन

पुण्य नगरी / प्रतिनिधी

इसापूर : देवळी येथील एसएसएनजे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने नांदोरा (डफरे) येथे श्रमसंस्कार शिबिर सुरु आहे. या शिबिरात अंनिसचे जिल्हा सचिव निलेश गुल्हाने यांनी माहितीचा अधिकार अधिनियम या विषयावर प्रबोधनात्मक मार्गदर्शन केले.

माहिती अधिकार कायद्यांतर्गत नागरिकांना कोणते अधिकार प्राप्त झाले. त्याचा उपयोग कसा करावा, या कायद्यातील तरतुदी कोणत्या, याबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच कोणत्याही कार्यालयातून हवी असलेली माहिती कोणत्या प्रकारे मागता येते. संबंधीतांकडून जर माहिती देण्यास टाळाटाळ होत असल्यास कोणती कारवाई केली जाऊ शकते तसेच कोणती माहिती देणे बंधनकारक नाही, हे सुद्धा त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ. प्रशांत हेलोंडे होते. त्यांनीही मार्गदर्शनकेले. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. गणेश मालधुरे यांनी केले. संचालन प्रज्ञा काटवारे यांनी केले. उपस्थितांचे आभार आकाश बहाळे याने मानले. या शिबिरात १०० स्वयंसेवक सहभागी झाले आहेत.दरम्यान विविध उपक्रम राबविण्यात येत आहे.

दुपारी 3.00 ते 4.30 या वेळेत श्री. निलेश गुल्हाणे यांचे 'माहितीचा अधिकार कायदा 2005' या विषयावर व्याख्यान झाले. या कार्यक्रमाला रा.से.यो. विभागीय समन्वयक प्रा.डॉ. गोपाल हेलोंडे हे अध्यक्ष होते. त्यांनी विद्यार्थ्यांना शासकीय योजनांची माहिती रा.से.यो. स्वयंसेवकानी ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचवावी अशी अपेक्षा व्यक्त केली.



त्यानंतर महिला सक्षमीकरण अंतर्गत बचत गटाचा मेळावा घेण्यात आला त्यावेळी सौ. अरुणा निकम हया मुख्य मार्गदर्शक होत्या व सौ. संगीता खोब्रागडे (माजी सरपंच) सौ. स्मिता सु.

बानकर (ग्रा.पं. सदस्या) सौ. वैशाली अतुल डफरे, सौ. उज्वला अनिल डफरे, सौ. वैशाली उमेशराव डफरे हया महिलांनी आपले अनुभव कथन केले.



www.tarunbharat.net
तरुण भारत — गुरुवार, ३१ जानेवारी २०१९ « ३

## ग्रामगीता प्रबोधनाने रासोयो शिबिराची सांगता

◆ देवळी, ३० जानेवारी

येथील एस. एस. एन. जे. महाविद्यालय देवळीचे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर दत्तकग्राम नांदोरा (डफरे) येथे झाले. पंचायत समिती देवळीचे माजी सभापती गुलाब डफरे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले.

स्वच्छतेसाठी युवक या संकल्पनेवर आधारित शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात सप्तखंजेरीवादक दीपक भांडेकर यांचे ग्रामगीतेवर प्रबोधनात्मक मार्गदर्शन झाले तर राष्ट्रीय कीर्तनकार दिगांबर महाराज गाडगे यांचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा भजनावर कीर्तन केले. त्यांनी ग्रामगीतेच्या आधारे ग्रामनिर्माण कला यांचे विवेचन केले. गावालों जडलेले जातीयवाद, राजकारण, व्यसनाधिनता हे तीन रोग बरे केल्याशिवाय गावाचा विकास होणार नाही असे त्यांनी सांगितले.

शिबिरादरम्यान आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी मेघे या हॉस्पीटलद्वारे मोफत आरोग्य शिबिर व रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या व्यतिरिक्त माहितीचा अधिकार, छत्रपती शिवाजी महाराजांनी शासन व्यवस्था, पर्यावरण, महिला सक्षमीकरण, युवकाकरिता विवेकानंद, अंधश्रद्धा निर्मूलन या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

बौद्धिक सत्राबरोबर सकाळच्या सत्रात रासेयो स्वयंसेवकांनी गावात रस्त्याचे नवीनिकरण केले व परिसरात स्वच्छता अभियान राबविले. ◀(तभा वृत्तसेवा)

त्यानंतर रात्री 7.30 ते 10.00 या वेळेत श्री. ह.भ.प. दिगंबरराव गाडगे यांचे राष्ट्रीय किर्तन झाले. त्यांनी ‘ग्रामगीता’ ग्रंथाच्या आधारे आजच्या समाजाच्या समस्या व त्याच्या निराकरणाचे उपाय यावर प्रबोधन केले.

**दिनांक 22 जानेवारी 2019 :–**

सकाळी 7.00 ते 8.00 या वेळेत प्रार्थना करण्यात आली व त्यानंतर मुरदगाव या शेजारच्या गावात ‘स्वच्छता संदेश’ रॅली काढण्यात आली. सकाळी 8.00 ते 9.00 या वेळेत नांदोरा (डफरे) गावातून मुख्य रस्त्याने स्वच्छता मोहिम परिक्रमा करण्यात आली.

दुपारी 3.00 वाजता शिबीराच्या समारोपीय कार्यक्रमाला सुरुवात झाली. यात नांदोरा (डफरे) येथील प्रतिष्ठित नागरिक श्री. भानुदासजी डफरे,

श्री. सुधाकरराव कोवे, श्री. राजाभाऊ देशमुख हे उपस्थित होते. त्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. तसेच निवडक स्वयंसेवकांनीही आपली मनोगते व्यक्त केली. शेवटी प्राचार्य डॉ. एस. आर. उपाध्याय यांचे समारोपीय भाषण झाले व शिबीराची सांगता झाली.

सांगता समारोहानंतर कार्यक्रम अधिकारी, महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी, रा.से.यो. स्वयंसेवक व गावातील प्रतिष्ठित नागरिक यांच्या स्नेहभोजनाचा कार्यक्रम झाला.

रात्री 10.00 ते 12.00 शेकोटीचा व प्रतिज्ञा ग्रहणाचा कार्यक्रम पार पडला.

## शिबीराला मान्यवरांच्या सदिच्छा भेटी

| | | |
|---|---|---|
| प्रा. मेघश्याम ठाकरे | – | जिल्हाध्यक्ष रा.से.यो. |
| डॉ. गोपाल हेलोंडे | – | विभागीय समन्वयक रा.से.यो. |
| प्राचार्य एस.आर. उपाध्याय | – | प्राचार्य |
| श्री. डी. सी. बोंबर्डे | – | तहसिलदार देवळी |
| श्री. मंगेशजी बारापात्रे | – | गटविकास अधिकारी<br>पंचायत समिती, देवळी |
| श्री. सतीशजी आत्राम | – | गटशिक्षणाधिकारी<br>पंचायत समिती देवळी |
| श्री. हर्षवर्धन गोल्हर | – | नगर परिषद सदस्य, देवळी |
| श्री. गणेश शेंडे | – | पत्रकार, देवळी |

# आभार

सत्र 2018–2019 या शैक्षणिक सत्रामध्ये आमच्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वर्षभर राबविण्यात आलेले नियमित कार्यक्रम व दिनांक 16 जानेवारी 2019 ते 22 जानेवारी 2019 या कालावधीत राबविण्यात आलेले विशेष निवासी श्रमसंस्कार शिबीर या उपक्रमांना अनेक मान्यवरांचे सहकार्य लाभले. तसेच नांदोरा (डफरे) येथील विशेष निवासी श्रमसंस्कार शिबीराकरिता श्री. मनोज डफरे सरपंच नांदोरा (डफरे) श्री. गुलाबराव डफरे, माजी सभापती, पंचायत समिती, देवळी, श्री. ह.भ.प. भानुदासजी डफरे, श्री. अतुल राऊत (सी.एम.आर.डी.एफ.) श्री. दिपक होले ग्रामसेवक नांदोरा (डफरे), श्री. प्रवीण देशमुख, श्री. निवृत्ती हाडके, श्री. राहूल डफरे आणि निखील भा. डफरे, प्रतीक बोटफोले, धीरज भोयर, समीर पारीसे, निखिल इंगोले, पिंटू वायरे, प्रसाद कारंजेकर, जय अ. डफरे यांचे विशेष सहकार्य लाभले.

तसेच आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. उपाध्याय, प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

सर्वांना धन्यवाद!!

**प्रा.डॉ. गणेश मालधुरे**
कार्यक्रम अधिकारी

**प्रा.डॉ. गोपाल हेलोंडे**
सहकार्यक्रम अधिकारी

एस. एस. एन. जे. महाविद्यालय
देवळी